EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

"शिक्षणामध्ये संगीत,चित्रकला आणि नृत्य यांचा समावेश"

सहा.प्रा.सौ.मोनाली संदिप गुल्हाने
शासकीय अध्यापक महाविद्यालय, यवतमाळ

सारांश

कला केवळ मनोरंजनाचे साधन नसून शिक्षणाचा अविभाज्य भाग आहे.संगीत नृत्य आणि चित्रकला यांचा समावेश मेंदूच्या दोन्ही भागांचा (दावा आणि उजवा) विकास होतो राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा देखील कला शिक्षणाला (Art Education) महत्वाचे स्थान देतो. शिक्षण हे केवळ सुशिक्षित करण्यासाठी नाही तर ते सुसंस्कारित करण्यासाठी असते. संस्काराचा आत्मा जेव्हा हरवतो त्या वेळेला राष्ट्रीय चारित्र्य कसे घडवावे हा प्रश्न उभा राहतो.त्यामुळे वैज्ञानिक प्रगती होत असतांना नैतिकता लयाला जाऊ नये याची जाणीव ठेवणे आवश्यक असते. यासाठी देशाला संकारक्षम, मूल्यधारित व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास करणाऱ्या शिक्षणाची गरज आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास करण्यासाठी मूलभूत विषयांच्या शिक्षणासोबत कौशल्य आधारित (जसे संगीत, चित्रकला आणि नृत्य इ.) विषयाचे शिक्षण महत्वपूर्ण भूमिका बजावते.संगीत हा मानवी जीवनाचा अभिन्न अंग आहे.मानवी शरीर,मन, आत्मा व बुद्धिशी संगीताचा प्रत्यक्ष संबंध आहे.कला शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि सामाजिक विकास होण्यास मदत होते.कला शिक्षण विद्यार्थ्यांना तणावमुक्त आणि आनंदी उत्साही ठेवताय त्यांच्यातील कल्पनाशक्ती व आत्मविश्वास वाढवतात.इतर शालेय अभ्यासक्रमाच्या तुलनेत संगीत विषयाला दुय्यम स्थान मिळते आहे. याबरोबर कला शिक्षणाचे खाजगी शिकवणी वर्ग चालवले जातातआणि आधुनिक तंत्रज्ञानसुद्धा उपलब्ध आहे.खाजगी परीक्षा सुद्धा घेता जातात.पण तरी कला शिक्षणाला खूप महत्व न दिल्यामुळे मुले अर्धवट सोडून जातात प्रस्तुत शोध पत्रामध्ये याचे कारण शोधण्याचा व त्यावर काय उपाययोजना करता येईल याचा अभ्यास संशोधकाने मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

मुख्यशब्द : शिक्षणामध्ये संगीत, चित्रकला आणि नृत्य इ.कलांचा समावेश त्याचे स्थान, महत्व कारणे आणि उपाययोजना

प्रस्तावना :- शैक्षणिक अभ्यासक्रमात संगीत, चित्रकला आणि नृत्याचा समावेश केल्यास विद्यार्थ्यांचा बौद्धिक, भावनिक आणि शारीरिक विकास अत्यंत वेगाने होतो.हे विषय विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता वाढवता ताणतणाव कमी करतात आणि शिक्षणाची प्रकियाआनंददायी व चिरस्थायी बनवतात. संगीत मानवी जीवनामध्ये नसते तर आज प्रत्येक माणसाच जीवन निरस झालेलं असत.आणि आपण बघितलं तर बाळाच्या जन्मापासून संगीताचा आणि मानवाचा संबंध जोडल्या गेलेला आहे. बाळाचं पहिलं रडण हा संगीतामधील 'नाद' आहे.आणि तो नाद ऐकायला आल्याशिवाय बाळाच्या जन्माचा उत्साह देखील साजरा केला जात नाही.तसेच संगीत हे आपल्या जीवनामध्ये किती आवश्यक आहे जसे बाळाला झोपवताना देखील अंगाई गीत गायले जाते. अंगणवाडीमध्ये मुलांना बालगीते,बडबड गीते त्याच बरोबर कृतीद्वारे गीते शिकविली जाते.जसे की,मुलांना समजण्यास अगदी सहज आणि सोपे होते.आणि वातावरण देखील आनंदमय होते.आणि शिकण्याची वृत्ती जागी होते. पारंपारिक शिक्षणासोबत ललित कला(संगीत,चित्रकला,नृत्य इ.) यांचा समावेश शिक्षणात असणे आवश्यक आहे विद्यार्थ्यांमध्ये व्यक्तिमत्व समृद्ध होते आणि त्यांची ग्रहणशक्ती वाढते. आजच्या व्यावसायिक युगात केवळ पुस्तकी यांना ज्ञानापेक्षा विद्यार्थ्यांचा भावनिक, मानसिक आणि शारीरिक विकास होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा व व्यक्तिमत्त्वाचा पाया शाळेतच रचला जातो. शाळेत मिळालेल्या शिक्षणाचा आणि संस्कार मूल्यांच्या आधारावर विद्यार्थ्यांचे पुढील जीवनातील यश अवलंबून असते. डॉ.ए.पी.जे.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

अब्दुल कलाम म्हणतात," शिक्षणाने माणसात सर्जनशीलता येते, सर्जनशील तिने प्रगल्भ विचार येतात व विचाराचे ज्ञान वाढते,"विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्यासाठी शालेय शिक्षणात विविध विविध विषयांच्या अध्ययन अध्यापना सोबतच अभ्यासपूरक उपक्रमांना देखील महत्त्व देणे आवश्यक आहे विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच खेळ, चित्रकला, संगीत, नैतिक मूल्य विविध कला आणि शारीरिक शिक्षण यांचा समावेश असणे खूप गरजेचे आहे . आणि म्हणून मनिषींनी,विद्वानांनी शरीर, मन व बुद्धीचा विकास करणारी व आत्मविश्वास निर्माण करणारी शिक्षण प्रणाली विकसित करण्याची गरज व्यक्त केली आहे.

उद्देश :-

शालेय अभ्यासक्रमात कला शिक्षणाची सध्याची स्थान.

संगीत चित्रकला आणि नृत्यामुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व भावनिक विकासावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

विद्यार्थ्यांना तणावमुक्त शिक्षण देण्याकरिता या कलांचा कसा उपयोग होतो हे शोधणे.

संस्कृतिक आणि ऐतिहासिक परंपरेची ओळख करून देणे.

संस्कृतीमधील संगीत नृत्य यांची मूल्य शिक्षणाद्वारे माहिती देऊन सांस्कृतिक सहिष्णुता आणि 'वसुधैव कुटुंबकम'ची भावना रुजविणे.

शिक्षणात कलांचे महत्व : मुळात शिक्षण या संज्ञेत व्यक्तीचा सर्वांगीण विकासाचा अर्थ दडलेला आहे. नेल्सन मंडेला म्हणतात," शिक्षण कोणतेही असो ते सर्वात शक्तिशाली शस्त्र आहे. ज्याचा वापर जग बदलण्यासाठी करता येतो," प्रत्येक देशाचा विकास हा त्या देशाच्या संस्कृतीच्या शिक्षणावर अवलंबून असते. जगभरातल्या जवळजवळ सर्व देशांच्या संस्कृतीचा संगीत हा अविभाज्य घटक आहे. धार्मिक विधी, समारंभ व उत्सव ,नृत्य, नाटक, चित्रकारी ,कथानदी कार्यक्रम विशिष्ट व्यायाम प्रकार, जादूच्या खेळण्यासारखे रंजन प्रकार असे अनेकविध सांस्कृतिक अविष्कार संगीताची जोड देऊन सादर केले जाते. अभ्यास पूरक उपक्रमाबद्दल विद्यार्थी जरी उत्सुक असले तरी इतर विषयाचे शिक्षकांमध्ये व पालकांमध्ये उदासीनता दिसून येते कला शिक्षणाचे महत्त्वाचे मुद्दे पुढील प्रमाणे:

संज्ञात्मक विकास- संगीत शिकल्याने स्मरणशक्ती आणि लक्ष केंद्रित करण्याची क्षमता वाढते चित्रकलेमुळे दृश्य स्थानिक तर्कशक्ती मजबूत होते.

शारीरिक समन्वय- नृत्यामुळे शारीरिक संतुलन, लय आणि मोटर कौशल्य विकसित होते.

आत्म-अभिव्यक्ती आणि भावना -विद्यार्थी शब्दांशिवाय त्यांच्या भावनांना कला संगीत नृत्यांच्या माध्यमातून वाट करून देऊ शकतात.

सांस्कृतिक जाणीव- या कला विविध संस्कृती आणि ऐतिहासिक पारंपारिक ओळख करून देतात, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण होते.

टीमवर्क आणि सहयोग- समूह नृत्य किंवा नाटकांसारख्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकत्र काम करण्याची आणि इतरांच्या मतांचा आदर करणे श्रुती वाढीस लागते.

विश्लेषण:-

शिक्षणामध्ये संगीत चित्रकला आणि नृत्यांचा समावेश केला मनोरंजनासाठी नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची गुरुकिल्ली आहे.(शारीरिक मानसिक आणि भावनिक) हे विषय विद्यार्थ्यांना तणाव मुक्त करतात, कल्पना वाढवतात आणि शिक्षण आनंदी व उत्साही बनवतात.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

संगीत :-

वैचारिक विकास :- संगीताच्या अभ्यासाने एकाग्रता आणि स्मरणशक्ती वाढते.

भावनिक नियंत्रण :- राग ताल आणि सुरांच्या माध्यमातून विद्यार्थी आपल्या योग्य प्रकारे भावना व्यक्त करू शकतात.

भाषिक कौशल्य :- गाण्याचे उच्चार त्याबद्दल टाळ्या आणि शब्दोचार यामुळे भाषिक क्षमता सुधारते.

चित्रकला :-

सर्जनशीलता व आकलन :- चित्रकला मुलांमध्ये कल्पनाशक्तीचा वाव देते. अमूर्त संकल्पना समजून घेणे सोपे जाते.

दृश्य अवकाशीय कौशल्य :- प्रमाण ,आकार आणि रंगांची जाणीव झाल्यामुळे निरीक्षण शक्ती तल्लख होते.

तणाव मुक्ती :- रंगांशी खेळताना मन शांत होते ज्यावेळी मानसिक आरोग्य सुधारते.

नृत्य :-

शारीरिक समन्वय :- तालावर पावले टिपणेआणि शरीराच्या लयबद्ध हालचालींमुळे शारीरिक संतुलन,ताकद आणि लवचिकता सुधारते.

आत्मविश्वास आणि संवाद :- हावभाव व मुद्रेच्या माध्यमातून विद्यार्थी न बोलताही कथा किंवा संदेश पोहोचू शकतात ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो.

गट बांधणी :- नृत्यांमध्ये सांघिक भावना वाढीस लागते आणि इतरांशी जुळवून घेण्याची सवय होते.

उपाययोजना :-तज्ञांच्या मते व्यक्तींच्या सर्वांगीण विकासात व्यक्तिमत्व सुसंस्कृत, प्रगल्भ व समृद्ध होण्यात इतर विषयाप्रमाणेच कला शिक्षणाचा मोठा वाटा असतो. प्रत्येक देशाच्या संगीतातून त्या देशाची संस्कृतीची ओळख होते व संस्कृतीचे जतन केले जाते.विद्यार्थ्यांना कला शिक्षणाची ओढ वाढवण्यासाठी त्यांना योग्य मार्गदर्शन देणे आवश्यक आहे. तसेच संगीत चित्रकला नृत्य यांचा वापर कसा करता येईल यावर उपाययोजना करण्याची गरज आहे.

विद्यार्थ्यांच्या मनात लहान वयापासूनच कला शिक्षणाची आवड निर्माण करणे.

विद्यार्थी पालक व शिक्षक यांच्यामध्ये कलाशिक्षणाविषयीचा गैरसमज दूर करणे.

कला शिक्षणाचे महत्त्व पालक, विद्यार्थी, शिक्षक यांना पटवून देण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करणे.

संगीत चित्रकला व नृत्य यांवर करियर उपयोगिता याविषयी माहिती विद्यार्थ्यांना व पालकांना देणे.

उद्देश पूर्ण, दर्जात्मक अशा शालेय शिक्षण अभ्यासक्रमाची निर्मिती करणे.

शाळेच्या वेळापत्रकात या कलांसाठी दर आठवड्याला दोन ते तीन राखीव ठेवावे आणि त्यांचा मूल्यांकनात समावेश करावा.

प्रत्येक शाळेत संगीत चित्रकला व नृत्य शिकवण्यासाठी तज्ञ शिक्षकांची नेमणूक करावी.

पुस्तके ज्ञानापेक्षा विद्यार्थी प्रत्यक्ष कृती करतील, गातील व रेखाटतील यावर भर द्यावा.

निष्कर्ष :- थोडक्यात असे म्हणता येईल की कला शिक्षण हे मानवाला अत्यंत उपयुक्त आहे. जसे संगीतातील सुर लय हे माणसांच्या रोमा रोमात भिनलेले आहे. मनुष्य जीवन कले शिवाय निरस आहे. शास्त्रीय दृष्टिकोनातून बघितले तर आज कला शिक्षणाचा ज्ञानाचा दृष्टिकोन सर्व शाखांमध्ये आहे. सध्याचे युग हे स्पर्धात्मक युग आहे. यामध्ये टिकून राहण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याला पुस्तकी ज्ञानासोबत कलाशिक्षण आत्मसात करण्याची अत्यंत गरज आहे. स्वतःचा विकास करून घ्यायचा असेल तर आपल्या देशाचा संस्कृती, नैतिक मूल्यांची व संस्कारांची जोपासना ही करायव लागेल. संगीतकला हे देशाच्या संस्कृतीचे प्रतीक असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेली अशी एक कला आहे. सुयोग्य परिवर्तन घडवून आणण्यासाठी कलाशिक्षणा हे अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका निभवते. विशेष प्राविण्य मिळवण्यासाठी योग्य मार्गदर्शक, उपक्रमाचे विकसन करण्याची आवश्यकता आहे. कलाशिक्षणाला अभ्यासक्रमामध्ये अंतर्भूत करून इतर विषयाप्रमाणेच महत्त्व द्यायला

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

हवे.कला शिक्षणातून चांगले संस्कार घडविले जातात आणि चांगल्या संस्कारातून चरित्र संपूर्ण व्यक्ती घडतात व चरित्र संपूर्ण व्यक्ती एक उत्तम देश घडवतो.

संदर्भसूची:-

देशपांडे, के.डी.(2015) कलाशिक्षण आणि अध्यापन

पेंडसे, ग.ह.(1990) भारतीय संगीत आणि शिक्षण, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती

शोधनिबंध :- तडवी, उतरा (2013)-महाविद्यालयीन शिक्षणामध्ये संगीताची सद्यस्थिती आणि प्रभावी प्रगतीच्या दिशा, संगीत कला विहार